।। बहुजन हिताय । बहुजन सुखाय ।।

४१ वर्षापासून नियमितपणे प्रकाशित होणारे जनसामान्यांच्या प्रश्नांचा ध्यास असणारे एकमेव निर्भिड...

४२

साप्ताहिक

# माणदेश वार्ता

संस्थापक संपादक :
स्व.मारुती शिवाजी सोनवणे (एम.ए.)

स्थापना
६ नोव्हेंबर १९८३

RNI NO.
MAH/MAR/2004/16467

POSTAL REGD.
L2/RNP/PPR/04/2024-2026

FACEBOOK
MANDESH VARTA

सांगोला | जुने वर्ष ४२ वे नवीन वर्ष २२ वे | रविवार दि २८ सप्टेंबर २०२५ | पाने ४ | मूल्य १ ₹ | अंक ४० वा




ग्रामदैवत श्री अंबिकादेवी,सांगोला



श्री तुळजाभवानी,तुळजापूर



श्री महालक्ष्मी,कोल्हापूर



श्री रेणुका,माहुरगड



श्री सप्तश्रृंगी,वणी

आमचे असंख्य वाचक,जाहिरातदार,हितचिंतक व तमाम जनतेला शारदीय नवरात्रौत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा.....!!! –संपादक



नवरात्रौत्सवा निमित्त सांगोला शहराचे ग्रामदैवत श्री. अंबिकादेवीच्या मंदिरावर करण्यात आलेली विद्युत रोषणाई

## शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी आणि सामान्य नागरिकांना सरकारकडून मदत मिळवून देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करू : आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख

सांगोला : सांगोला तालुक्यात दोन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. शेतातील उभ्या पिकांवर पावसाचे पाणी साचून ते कुजण्याच्या अवस्थेत आले आहे, तर अनेक घरात पाणी शिरल्यामुळे नागरिकांना हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. रस्ते, गटारे आणि नाले तुंबल्याने वाहतुकीचीही मोठी अडचण निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर शनिवारी सकाळपासून आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख स्वतः भर पावसात रस्त्यावर उतरले. त्यांनी सांगोला तालुक्यातील डिकसळ, कडलास,मांजरी, बुध्देहाळ, गौडवाडी, चिंचोली तलाव आदी भागात भेट देत नुकसानीची पाहणी केली, शेतकरी बांधवांची विचारपूस केली आणि नागरिकांना काळजी घेण्याचे आवाहन केले.

सकाळपासून सुरू झालेल्या त्यांच्या दौऱ्यात त्यांनी सांगोला, व ग्रामीण



भागातील अनेक गावे गाठली. प्रत्येक ठिकाणी शेतकरी आणि नागरिक मोठ्या संख्येने त्यांना भेटण्यासाठी जमले होते. पावसाची तमा न बाळगता त्यांनी सर्वांशी संवाद साधला. पिकांचे नुकसान पाहून त्यांनी शेतकऱ्यांना धीर दिला आणि शासनाकडे तात्काळ मदतीसाठी पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. या संकटात शेतकरी बांधवांना सरकारकडून मदत मिळवून देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करू, काळजी करू नका, असे आश्वस्त करणारे शब्द त्यांनी उच्चारले.

पावसामुळे घरांचे व रस्त्यांचे झालेले नुकसानही त्यांनी प्रत्यक्ष पाहिले. गावकऱ्यांशी बोलताना त्यांनी सुरक्षिततेची काळजी घेण्याची विनंती केली. पावसात अनावश्यक धाडस करू नका, वृद्ध आणि लहान मुलांची विशेष काळजी घ्या, असे आवाहन त्यांनी केले. शेतकरी बांधवांच्या व्यथा ऐकताना त्यांच्या चेहऱ्यावर काळजी स्पष्ट दिसत होती. त्यांनी प्रशासनाशी तातडीने संपर्क साधून पंचनामे करण्याची आणि मदत उपलब्ध करून देण्याची कार्यवाही करण्याची हमी दिली.

गावागावात शेतकरी, तरुण, महिला आणि वृद्ध नागरिकांनी त्यांचे स्वागत केले. अनेकांनी आपल्या अडचणी मांडल्या. आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी प्रत्येकाचे म्हणणे लक्षपूर्वक ऐकले आणि त्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी ठोस पाठपुरावा करू, असे आश्वासन दिले.

# पन्नास वर्षाचा सांगोला तालुक्यात पावसाचा विक्रम मोडीत सांगोला तालुक्यात माण नदीच्या पाणी पातळीत वाढ

### माण नदी काठच्या नागरिकांना सतर्कतेचा प्रशासनाचा इशारा;खरीप पिके पाण्याखाली गेल्याने शेतकरी हवालदिल





सांगोला : सांगोला तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून सतत कोसळणाऱ्या पावसामुळे नदी–नाले तुडुंब भरले असून मान, कोरडा, अप्रूका व बेलवन या चारही नद्यांना तब्बल ९० टक्के पाणी आले आहे. गेल्या ५० वर्षांत अशी परिस्थिती तालुक्यात कधीच उद्‌भवली नव्हती. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या सतत सुरू असलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

खरीप पिके पाण्याखाली गेल्याने शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर चिंता ओसंडून वाहत आहे. आधीच अवकाळी पावसामुळे नुकसान झालेले असताना आता पुन्हा अशा पावसामुळे शेतकरी वर्ग हवालदिल झाला आहे. नगरपरिषद व प्रशासनाकडून सतत परिस्थितीवर लक्ष ठेवले जात असून नागरिकांनी गरजेव्यतिरिक्त घराबाहेर पडू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. पूरपरिस्थिती उद्भवू नये यासाठी विविध यंत्रणा सतर्क आहेत.

तरीही पावसाचा जोर कमी न झाल्यास नदीकाठच्या गावांना पाण्याचा मोठा फटका बसू शकतो. मान, महिम येथील कासाळ गंगा ओढ्याला पाणी आल्याने महूदअकलूज मार्गावरील वाहतूक बंद झाली आहे. सांगोला– महूद रोडवरील चिंचोली तलाव शेजारील पूल पूर्णपणे पाण्याखाली गेला आहे. त्यामुळे या मार्गावरील सर्व वाहतूक ठप्प झाली आहे. दरम्यान, सांगोला जवळील ओढ्यालाही पाणी आल्यामुळे वाहतूक बंद करण्यात आली आहे. कोरडा, अप्रूका व बेलवन या नद्यांच्या काठावरील गावांमध्ये पाणी शिरण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

मागील पन्नास वर्षांमध्ये सांगोला तालुक्यात एवढ्या प्रमाणात पाऊस कधीच झाला नसून यंदाच्या पावसाने सर्वच विक्रम मोडीत काढले आहेत. नागरिकांना या अभूतपूर्व पावसाने भयंकर हैराण केले असून काही दिवस पाऊस असाच सुरू राहिला तर मोठा अनर्थ घडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

माण नदीच्या पाणलोट क्षेत्रामध्ये पाऊस झाल्याने व पाण्याची आवक वाढलेने माण नदीच्या पाणी पातळीमध्ये झपाटयाने वाढ होत आहे. पावसाच्या प्रमाणानुसार व माण नदीत येणाऱ्या पाण्याच्या आवक नुसार नदीच्या विसर्गामध्ये वाढ होण्याची शक्यता आहे.

. त्यामुळे माण नदी काठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. त्यानुषंगाने, नदीपात्रालगत पूरस्थिती निर्माण होवून सखल भागातील नागरी वस्तीमध्ये पूराचे पाणी शिरण्याची शक्यता आहे.

तरी सुरक्षिततेच्या दृष्टीने माण नदी काठच्या गावांना व नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. तसेच आवश्यक त्या उपाययोजना करणेत याव्यात, अशा सूचना उप कार्यकारी अभियंता, भीमा पाटबंधारे विभाग पंढरपूर यांचेकडून संबंधीतांना देण्यात आलेल्या आहेत.

# घटस्थापना व नवरात्रोत्सव : श्रद्धेचा दीप आणि स्त्रीशक्तीचा जागर



भारताचा प्रत्येक सण हा केवळ आनंदाचा क्षण नसतो, तर तो आपल्याला जीवन जगण्याची नवी दिशा देतो. नवरात्रोत्सव हा त्यापैकीच एक महत्त्वाचा उत्सव. आश्विन शुद्ध प्रतिपदेपासून घटस्थापनेने या उत्सवाची सुरुवात होते. त्या क्षणी प्रत्येक घरात, प्रत्येक अंतःकरणात एक नवी उर्जा, एक नवा प्रकाश जागतो. घटस्थापना हा हिंदू धर्मातील एक विधी आहे. आश्विन शुद्ध प्रतिपदा या तिथीला स्वरूप घडा किंवा कलश याच्या ठिकाणी देवीची स्थापना केली जाते आणि याचे नऊ दिवस पूजन केले जाते. ताटात गंगाजलाने भरलेला कलश ठेवून आणि त्यात नाणी, सुपारी आणि कच्चा तांदूळ आणि हळद पावडर पासून तयार केलेले अक्षत भरतात. त्यावर आंब्याची पाच पाने आणि एक नारळ घालतात. शेवटी माँ शैलपुत्री आणि माँ दुर्गा यांची पूजा करतात आणि तेलाचा दिवा, अगरबत्ती, फुले, फळे, मिठाई आणि देशी तुपाचा विशेष भोग लावतात. तसेच आश्विन महिन्यात घटामध्ये देवीची स्थापना करून, नंदादीप प्रज्वलित करून आदिमायेची नऊ दिवस मनोभावे पूजा करणे, म्हणजेच घटस्थापना किंवा नवरात्रोत्सव. घटस्थापना दरम्यान लोक कलशात पवित्र पाणी भरतात. त्यानंतर कलशावर शेणाचा लेप केला जातो आणि त्यात बार्लीच्या बिया पेरल्या जातात. नंतर ते वाळूच्या खड्ड्यात ठेवले जाते. कलश हिंदू विधींमध्ये खोल प्रतीकात्मकता धारण करतो, विपुलता, समृद्धी आणि आध्यात्मिक शुद्धतेचे प्रतिनिधित्व करतो. हे पवित्र गंगा नदीच्या पाण्याने भरलेले आहे, जे जीवन टिकवून ठेवणाऱ्या दैवी उर्जेचे प्रतीक आहे. कलश हे दैवी पात्र म्हणून पूजनीय आहे आणि समारंभांमध्ये तांदळाच्या पलंगावर ठेवले जाते.

जेव्हा आपण मातीत बी पेरतो, तेव्हा ती छोटीशी हिरवी कोंब दिसण्यासाठी आपल्या डोळ्यांत किती प्रेम असतं! घटस्थापनेतले हे धान्य फक्त अन्नधान्याचे प्रतीक नसते, तर जीवनातील नव्या उमेदिचे, नव्या स्वप्नांचे आणि नव्या विश्वासाचे प्रतीक असते. कलशातील पाणी आपल्याला सांगते जीवन सतत वाहतं, अडथळे आले तरी थांबत नाही. आणि नारळ आपल्याला आठवण करून देतो कणखर आवरणातही गोडवा दडलेला असतो. नवरात्रीत आपण देवीच्या नऊ रूपांची पूजा करतो. परंतु ती देवी केवळ आकाशातील एखादी मूर्ती नसते, ती आपल्याजवळच असते-आपली आई, बहीण, पत्नी, मुलगी, शिक्षिका, कामगार स्त्री. तिच्या त्यागातून, तिच्या कष्टातून आणि तिच्या प्रेमातूनच खऱ्या शक्तीचा उगम होतो. घटस्थापना आपल्याला शिकवते की ज्या हातांनी संसार उभा राहतो, ज्या हृदयाने संसार सांभाळला जातो, त्याच हातांना, त्याच हृदयाला आपण वंदन करायला हवे.

नवरात्रीच्या रात्री गावोगावी होणारे जागर, भजनी मंडळींचे सूर, दांडिया-गरब्याची तालबद्ध पावलंहे सगळं एकच सांगतं, की माणूस एकटा आनंद शोधू शकत नाही. आनंद तेव्हाच खरा जेव्हा तो सामायिक केला जातो. देवीसमोर बसून केलेली सामूहिक आरती, सगळयांच्या डोळ्यांत चमकणारी श्रद्धाहीच खरी एकात्मतेची मूर्ती आहे. आज समाजात तणाव, भेदभाव, हिंसा वाढत चालली आहे. अशावेळी घटस्थापनेतून मिळणारा संदेश अधिक महत्त्वाचा ठरतो जसे धान्य मातीमध्ये पेरले की अंकुर फुटतो, तसेच प्रेम पेरले तर समाजात सौहार्द अंकुरतो. नवरात्रोत्सवाने आपण केवळ देवीची पूजा न करता, प्रत्येक स्त्रीला सन्मान द्यावा, प्रत्येक दुर्बलाला आधार द्यावा, हेच या सणाचे खरे पालन आहे.

नवरात्रींचे उत्सव संपूर्ण महाराष्ट्रात वेगवेगळे असतात आणि विशिष्ट संस्कार क्षेत्रांमध्ये भिन्न असतात, जरी त्यांना समान म्हटले जाते आणि एकाच देवतेला समर्पित केले जाते. सर्वात सामान्य उत्सव नवरात्रीच्या पहिल्या दिवशी घटस्थापनेने सुरू होतो, ज्याचा शाब्दिक अर्थ भांडगे चढवणे असा होतो. घटस्थापना पूजेचे महत्त्व आणि महत्त्व हे जीवनाच्या सर्व क्षेत्रात देवींचे सामर्थ्य प्राप्त करण्याचा प्रयत्न करते. या व्यतिरिक्त हा चांगला आणि वाईट यांच्यातील लढाईच्या प्रारंभाचा उत्सव आहे. संपूर्ण सणात कलशाची पूजा केली जाते त्यानंतर दहाव्या दिवशी किंवा विजयादशमीला कलश विसर्जन केले जाते.

महाराष्ट्रात नवरात्रीची ही पोकळी भरून काढण्यासाठी, प्रबोधनकार, बोले आणि इतरांनी नवरात्र हा जनसामान्यांचा उत्सव म्हणून साजरा करण्यास सुरुवात केली, प्रबोधनकारांनी शिवाजी महाराजांनी पूजलेल्या तुळजापूरच्या भवानीला महाराष्ट्राचे प्रमुख दैवत म्हणून धारण केले. हिंदूंना जातीपातीच्या ओलांडून एकत्र आणण्याची कल्पना होती. त्यांच्या चरित्रात, प्रबोधनकार असा दावा करतात की, शिवाजी महाराजांच्या काळात जरी नवरात्र साजरी केली जात असली तरी पुण्यातील ब्राह्मण पेशव्यांच्या काळात गणेशपूजेला प्राधान्य मिळाले. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी नंतर सार्वजनिक उत्सवाच्या माध्यमातून गणेश उपासना परंपरेचे पुनरुज्जीवन केले. महाराष्ट्रातील यवतमाळ जिल्हा हा नवरात्रोत्सवासाठी प्रसिद्ध आहे. उत्सवादरम्यान शहर दिव्यांनी सजवले जाते आणि अनेक सांस्कृतिक कार्यक्रम होतात.

नवरात्र हे साधारणपणे नऊ दिवसांचे असते पण तिथीचा क्षय झाल्याने ती आठ दिवसांची किंवा वृद्धी झाल्यास दहा दिवसांची असू शकते. चंपाषष्ठीची म्हणजे खंडोबाची नवरात्र फक्त सहा दिवसांचे असते. सर्व देवांच्या ठिकाणी असलेल्या शक्तींचे दैवतीकरण होऊन त्या शक्तिरूप मूर्तीला देवी असे नाव मिळाले आणि शाक्त संप्रदायी लोकांनी तिला सर्वश्रेष्ठ देवता, आदिमाया किंवा जगदंबा म्हणून गौरविले. देवीची उग्र व सौम्य अशी दोन रूपे पहायला मिळतात. उमा, गौरी, पार्वती, जगदंबा, भवानी ही देवीच्या सौम्य रूपांची नावे असून दुर्गा, काली, चंडी, भैरवी, चामुंडा ही देवीची उग्र रूपे आहेत. शैलपुत्री, ब्रह्मचारिणी, चंद्रघंटा, कुष्मांडी, कंदमाता, कात्यायनी, कालरात्री, महागौरी आणि सिद्धिदात्री अशी ही देवीची नऊ रूपे आहेत. मार्कंडेय पुराणातील देवी माहात्म्यात सांगितले आहे शरद ऋतूतील वार्षिक महापूजेत देवीमाहात्म्य भक्तिपूर्वक ऐकल्यास सर्व बंधनांपासून व्यक्ती मुक्त होते आणि धनधान्याने परिपूर्ण होते.

नवरात्र हा ऋतू परिवर्तनाचा काल असतो. यामुळे आपल्या नवीन शक्ती, नवा उत्साह, उमेद निर्माण होत असते. बृहत संहितेनुसार सूर्य तसेच इतर ग्रहांमध्ये होणाऱ्या परिवर्तनाचा प्रभाव मनुष्याच्या आरोग्यावर आणि व्यवहारांवर होत असतो. सृष्टीतील परिवर्तन हा शक्तीचाच खेळ आहे. ब्रह्मचर्य, संयम, उपासना, यज्ञ केल्याने शरीरात रोगप्रतिकारक शक्ती वाढते. स्मरणशक्ती चांगली होऊन बौद्धिक विकास होतो. म्हणून नवरात्र हा शारीरिक व आत्मिक शुद्धतेचा काळ आहे असे मानले जाते. गुजरातमध्ये नवरात्री उत्सव उत्साहाने साजरा केला जातो. दांडिया किंवा दांडिया रास हे गुजरातमधील लोकनृत्य आहे. हे समूहनृत्य विशेष करून नवरात्रात नाचले जाते. गुजरातमध्ये कोणत्याही सणाला किंवा शुभप्रसंगी हे नृत्य करण्याची परंपरा आहे. गरबा हा गुजरातमधील नवरात्री उत्सवातील पारंपरिक नृत्याचा प्रकार आहे. एका रंगीत घड्याला छिद्रे पाडून त्यात दिवा लावला जातो आणि त्याची पूजा केली जाते. या घड्याला गरबो असे म्हणतात.

गरबा खेळणे म्हणजे टाळयांच्या किंवा बहुधा लाकडी दांड्यांच्या लयबद्ध गजरामध्ये देवीची भक्तिरसपूर्ण गाणी म्हणणे. गरब्याच्या वेळी गोलाकार फेर धरून केलेले मंडल हे घटाचे प्रतीक असते, यांच्या मध्यभागी छिद्र असलेल्या रंगीबेरंगी मातीच्या घड्यात दिवे लावले जातात आणि त्याभोवती गोलाकार नाचण्याची पद्धत आहे. नवरात्र साधारणपणे देवीचे असते, पण इतर देवांची नवरात्रेही असतात. तुळजाभवानीचे नवरात्र दहा दिवसांचे असते, तशीच खंडोबाचे, व्यंकटेशाचे, नरसिंहाचे, दत्ताचे अशी इतरही नवरात्रे असतात. यापैकी नरसिंहाचे नवरात्र तीन ते नऊ दिवस, खंडोबाचे पाच किंवा सहा दिवस, बालाजी (व्यंकटेशाचे) दहा दिवस, दत्ताचे नऊ ते दहा दिवस असते. आश्विन शुक्ल प्रतिपदेपासून सुरू होणाऱ्या नवरात्रीं खेरीज, आश्विन शुक्ल तृतीयेपासून सुरू होणारा सप्तरात्रोत्सव, पंचमीपासून सुरू होणारा पंचरात्रोत्सव आणि सप्तमीपासून सुरू होणारा त्रिरात्रोत्सव ही कमी-अधिक दिवसांची नवरात्रे असतात.

नवरात्री दरम्यान विशिष्ट रंग परिधान करणे शुभ मानले जाते, कारण प्रत्येक दिवसाचा एक वेगळा दुवा आणि महत्त्वपूर्ण आध्यात्मिक अर्थ आहे. नवरात्रीचा पहिला रंग हा उत्सव सुरू होणाऱ्या आठवड्याच्या दिवसानुसार निवडला जातो आणि उरलेले आठ दिवस पूर्वनिश्चित चक्रानुसार रंगवले जातात. नवरात्रीचे नऊ रंग पिवळे, हिरवे, राखाडी, केशरी, पांढरे, लाल, रॉयल ब्लू, गुलाबी आणि जांभळे आहेत. या रंगांचा उपयोग उत्सवादरम्यान पूजा केल्या जाणाऱ्या प्रत्येक देवींचे चित्रण करण्यासाठी केला जातो. सोमवार: पांढरा - स्वतःला पांढरी फुले आणि इतर वस्तूंनी वेढून घ्या. मंगळवार: लाल - तुमच्या कम्फर्ट झोनमधून बाहेर पडण्यासाठी आव्हाने स्वीकारा. बुधवार: तुमची प्रलंबित कामे अभ्यासण्यासाठी आणि पूर्ण करण्यासाठी हिरवा दिवस चांगला आहे. गुरुवार: पिवळा - शैक्षणिक उत्कृष्टतेचा पाठपुरावा करण्यासाठी उत्कृष्ट दिवस.

घटस्थापना ही फक्त एका कलशाची स्थापना नाही, तर ती आपल्या अंतःकरणात श्रद्धेचा दीप प्रज्वलित करण्याची प्रक्रिया आहे. नवरात्रोत्सव हा फक्त नऊ दिवसांचा उत्सव नाही, तो जीवनभर जपण्याजोगा संस्कार आहे. शक्तीची उपासना करून जर आपण स्त्रीला खरा मान, समाजाला खरी एकात्मता आणि निसर्गाला खरी जपणूक दिली, तर हाच उत्सव आपल्या जीवनाला खरं यश देईल. घटस्थापना आणि शारदीय नवरात्री तुमच्या आयुष्यात सुख, समृद्धी, शांती घेवून येवो, हीच सदिच्छा व घटस्थापना व नवरात्रोत्सव मंगल पर्वाच्या हार्दिक शुभेच्छा !

-प्रविण बागडे,नागपूर

*************

# सांगोला तालुक्यातील घेरडी मंडल मध्ये अतिवृष्टीमुळे शेती व पिकांचे प्रचंड नुकसान

सांगोला : सांगोला तालुक्यातील घेरडी मंडलकडे स्वयंचलित हवामान केंद्र नाही तसेच परिसराची पाहणी करण्यासाठी कोणताही प्रशासनाचा अधिकारी शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत बांधापर्यंत पोहोचला नसताना अतिवृष्टी नाही असे समजून घेरडी मंडल नुकसानीच्या पंचनाम्यापासून वंचित ठेवले आहे त्यामुळे याचा फटका या परिसरातील शेतकरी व ग्रामस्थ यांना बसला आहे.

सध्या सर्वत्र अतिवृष्टी सुरु आहे. सांगोला तालुक्यातील घेरडी येथेही अतिवृष्टी झाली असून त्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. अनेकांच्या घरात पाणी शिरले आहे. शेत शिवाराला पाझर लागले आहे. त्यामुळे सर्वसामान्य हवालदिल झाले आहेत. अतिवृष्टीने नुकसान झालेल्या नुकसानग्रस्ताना दिलासा मिळण्यापेक्षा प्रशासनाच्या अक्षम्य हलगर्जीपणाने शेतकरी व ग्रामस्थ हवालदिल झाले आहेत. घेरडी मंडल मध्ये अतिवृष्टी होऊन या परिसरात शेत शिवार व सर्वसामान्यांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झालेले असताना देखील प्रशासनाच्या या गलथान कारभाराचा फटका इथे सर्वसामान्यांना बसला आहे .

प्रशासनाने नुकसानग्रस्त नागरिकांना अतिवृष्टीच्या अशा गंभीर परिस्थितीमध्ये सर्वसामान्यांना दिलासा देण्यासाठी येथील नुकसानीचे पंचनामे तात्काळ करून नुकसानीचा मोबदला मिळण्यासाठी संवेदनशीलता दाखवून परिसरातील शेतकरी व सर्वसामान्यांना दिलासा द्यावा अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. शेतकऱ्यांच्या शेतामध्ये गेली अनेक दिवस गुडघ्या इतके पाणी जरा बांधावर या.... शेती पिके बघा.. आणि मग निष्कर्ष काढा सांगोला तालुक्यातील सहा मंडल मध्ये पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश असून उर्वरित तीनमंडल पैकी घेरडी येथे प्रशासनाच्या दिरंगाईमुळे स्वयंचलित हवामान केंद्र नाही. त्यामुळे अचूक पर्जन्याची नोंद नाही. तांत्रिक कारण पुढे करण्यापेक्षा प्रशासनातील जबाबदार अधिकारी व लोकप्रतिनिधी यांनी प्रत्यक्ष पाहणी करून वस्तुस्थिती विचारात घ्यावी. नुकसानग्रस्त व बाधितांना न्याय द्यावा घेरडीकरांकडून मागणी होती.



शेतात पाणी साचून राहिले आहे, तसेच काहींच्या शेत शिवारात पाण्याचे पाझर लागल्याने उभ्या पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. अतिवृष्टीमुळे अनेकांच्या घरांमध्ये पण पाणी गेले होते. स्वयंचलित हवामान केंद्रासंबंधी असणारा असंवेदनशील व बेजाबाबदारपणाचा फटका नुकसानग्रस्तांना बसणार असल्याची चर्चा असल्याने याविषयी तीव्र संताप व्यक्त होत आहे. तरीदेखील येथील वास्तविक परिस्थिती लक्षात घेऊन प्रशासन नुकसानग्रस्तांना दिलासा देईल का असा सवाल उपस्थित होत आहे.

माणदेश वार्ता हे साप्ताहिक मालक, प्रकाशक, संपादक सोनवणे रोहित मारूती यांनी मुद्रक माळी अशोक बाळकृष्ण यांच्या बाळकृष्ण ऑफसेट प्रिंटर्स,नेहरू चौक, कोर्टा जवळ, सांगोला, जि. सोलापूर येथे छापून १२७९ अ भारत गल्ली, सांगोला, जि.सोलापूर येथे प्रसिद्ध केले. E-Mail- mandesh_varta@rediffmail.com
संपादक : सोनवणे रोहित मारूती (या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) . जुने वर्ष-४२ वे अंक-४३ वा मो. ९४२०६६६५०१, ९०२८५९१४३१

# गरब्याचे आयोजनामुळे महिलांना नृत्य आणि पारंपरिक कला सादर करण्याची संधी मिळते - अमृता फडणवीस



सांगोला : गरब्याचे आयोजन केल्याने महिलांना नृत्य आणि पारंपरिक कला सादर करण्याची संधी मिळते, ज्यामुळे त्यांचे कलागुण प्रदर्शित होतात आणि त्यांना प्रोत्साहन मिळते. या आयोजनांमुळे महिलांना एकत्र येण्यासाठी आणि सांस्कृतिक कार्यक्रमात सक्रिय सहभाग घेण्यासाठी एक सुरक्षित आणि आनंदी व्यासपीठ मिळते. यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळते आणि समाजात त्यांच्या कलागुणांना अधिक महत्त्व प्राप्त होते, असे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या उद्घाटनानंतर अमृता फडणवीस यांना गरबा खेळण्याचा मोह आवरता आला नाही. गरब्याच्या विविध गाण्यांवर त्यांनी काही तरुणी, महिलांसह गरबा खेळण्याचा अगदी मनमुराद आनंद लुटला. यावेळी सहभागी झालेल्या तरुणी, महिलांसह अमृता फडणवीस याही गरबा खेळण्यात सहभागी झाल्याने सर्वांनाच आनंद झाला. छत्रपती शिवाजीनगर नवरात्रोत्सव मंडळ,सांगोला व जोतिर्लिंग प्रतिष्ठान संचलित, जोतिर्लिंग प्रतिष्ठान आयोजित दांडिया गरबा नाईट-२०२५ या कार्यक्रमाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर, माजी जिल्हा परिषद सदस्या जिजामाला रणजितसिंह नाईक निंबाळकर, भाजप जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत, सुजाता चेतनसिंह केदार सावंत, पुण्याचे माजी नगरसेवक सम्राट थोरात, सिंगर संजू राठोड, बिग बॉस फेम जानवी किल्लेकर यांच्यासह हजारो महिला उपस्थित होत्या.

पुढे बोलताना अमृता फडणवीस म्हणाल्या की, सांगोल्याच्या कर्तबगार महिला आणि पुरुषांनी डाळींबाच्या उत्पादनात सांगोल्याचे नाव देश आणि जागतिक पातळीवरती पोहचवून देशाला परकीय चलन मिळवून देण्यामध्ये मोलाचे सहकार्य केले आहे असे त्यांनी सांगितले.

यावेळी बोलताना भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत म्हणाले की, सांगोल्याच्या भूमीत गेल्या तीन वर्षांपासून सातत्याने चालवलेला भव्य दांडिया स्पर्धा हा फक्त मनोरंजनापुरता कार्यक्रम नाही. हा उपक्रम म्हणजे एक संस्कृतीचा उत्सव आहे, एक महिला सक्षमीकरणाचा संकल्प आहे. समाजात महिला ही घरासाठी, कुटुंबासाठी, नातीगोतींसाठी स्वतःला पूर्णपणे अर्पण करते. पण तिच्या कलेला, कौशल्याला, मेहनतीला कौतुकाची दाद मिळत नाही, सन्मान मिळत नाही. आज इथल्या प्रत्येक महिलेला, प्रत्येक बहिणीला, हक्काचं व्यासपीठ मिळावं, तिच्या कलागुणांना वाव मिळावा, तिचं कौतुक व्हावं हाच या उपक्रमामागचा उद्देश आहे. अमृता फडणवीस यांच्या उपस्थितीत या कार्यक्रमाचं सौंदर्य अधिकच उजळून निघालं आहे. त्यांच्या कार्यातून महिलांना प्रेरणा मिळते, त्यांच्या उपस्थितीने आजच्या या व्यासपीठाचं महत्त्व अधिक अधोरेखित झालं आहे. सांगोला हा फक्त दांडियाचा उत्सव साजरा करणारं शहर राहणार नाही, तर महिला सक्षमीकरणाचं केंद्रबिंदू बनणार आहे असे त्यांनी सांगितले.

महोत्सवाला महिलांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद देत पारंपरिक गुजराथी, राजस्थानी वेषभूषा करून दांडिया खेळण्यास आल्या होत्या.

राज्यात अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून एनडीआरएफ व एसडीआरएफ यांच्या माध्यमातून मदत केली जात आहे. नुकसानीचे पंचनामे केले जात आहेत. राज्यावरील संकट लवकरात लवकर दूर होऊ दे असे देवीला साकडं घातलं आहे यावेळी अमृता फडणवीस म्हणाल्या.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अफजल शेख, किरण चव्हाण, इन्नुस नदाफ, विनोद काटकर, सौरभ देशपांडे, चिवळ्या कोळी, अविनाश गायकवाड, नागेश लोखंडे, राजू शिंदे, अनिल शिंदे, पिंटू शिंदे, सुरेश जगधने, शुभम डांगे, शाम माळी यांच्यासह छत्रपती शिवाजीनगर नवरात्रोत्सव मंडळ,सांगोला व जोतिर्लिंग प्रतिष्ठान संचलित, जोतिर्लिंग प्रतिष्ठानचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी परिश्रम घेतले.

## सह्याद्री फार्मसी कॉलेजचा फार्माकोव्हिजिलन्स सप्ताह कार्यक्रम जल्लोषात संपन्न



सांगोला : भारत सरकार व पीसीआय, नवी दिल्ली यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार १७ सप्टेंबर ते २३ सप्टेंबर हा फार्माकोव्हिजिलन्स सप्ताह म्हणून साजरा करण्यात आला तुमची सुरक्षितता, फक्त एका क्लिककवर:भारताच्या फार्माकोव्हिजिलन्स कार्यक्रमला तक्रार करा; हि या वर्षाची थीम आहे. फार्माकोव्हिजिलन्स सप्ताह निमित्त सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसी, मेथवडे महाविद्यालयातर्फे कै.अभिजित कदम विद्यालय मेथवडे या शाळेच्या प्रांगणात कार्यक्रम घेण्यात आला. त्यास विद्यार्थी, पालक, नागरिक यांच्या उत्स्फूर्त सहभाग लाभला. कार्यक्रमाचे उदघाटन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ.दिलीपकुमार इंगवले, कै.अभिजित कदम विद्यालय मेथवडे या शाळेचे मुख्याध्यापक श्री.बी.एन.मेटकरी, श्री.डी.एन.जाधव, शाळेचे सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मनोजकुमार पाटील व उपस्थित सर्व शिक्षक, विद्यार्थी, पालक, नागरिक यांच्या उपस्थित झाले. विद्यार्थिनी रोकडे प्राजक्ता, मोटे भारती, खिलारे ज्योती, श्रद्धा पवार, इनामदार राबिया, पाटील शिवानी, पवार प्रतीक्षा, माळी लकी, आवताडे अर्पिता, खरात दिनेश, सोनवळे संकेत, हन्नुरे प्रियांका, लवटे स्वाती, जानकर प्रज्ञा, देवळे काजल, काळे मनीषा, पालकर ओंकार, कोकाटे चैतन्य, कुलकर्णी शास्वत, जगताप उत्कर्षा, खरात शीतल, कांबळे आदित्य, नागणे यश, मुलाणी मुजीब, चव्हाण अथर्व, पांचाळ आदर्श, हत्तुरे ओंकार, माने अक्षरा, पटेद गुरुदेवी या विद्यार्थ्यांनी सुरेख अशी संदेश फलके तयार केली होती व स्टेजवर येऊन संदेशफलका द्वारे उपस्थिती विद्यार्थी,नागरिक याना फार्माकोव्हिजिलन्स व त्याची इतंभूत माहिती दिली तसेच विविध आजार व त्यावर देण्यात येणारे औषधे यांची माहिती सांगून फार्मासिस्टकडून योग्य सल्ले न घेता त्यांचा वापर केल्यामुळे होणारे शरीरा वरील दुष्परिणाम,प्रतिकूल परिणाम व संकटे व त्यावरील उपाय याबद्दल उदाहरणासहित माहिती देऊन मने जिंकली. सुत्रसंचलन भारती मोटे, रोकडे प्राजक्ता यांनी तर आभार के.एस.चौगुले सर यांनी केले. रॅली यशस्वी करण्यासाठी डॉ.एन.ए.तांबोळी व प्रा.ए .आर.पवार सर्व शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी,सर्व विद्यार्थी व नागरिक यांचे योगदान लाभले.

## फॅबटेक पॉलिटेक्निक कॉलेजची सुमागो इन्फोटेक कंपनीला भेट

सांगोला : फॅबटेक पॉलिटेक्निक कॉलेज सांगोला हे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी सतत विविध उपक्रम राबवते. चालू शैक्षणिक वर्षात महाविद्यालयाच्या कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग विभागाने पुणे येथील सुमागो इन्फोटेक प्रायव्हेट लिमिटेड या सॉफ्टवेअर कंपनीला भेट दिली असल्याची माहिती कॉम्प्युटर सायन्स ॲण्ड इंजिनिअरिंग विभाग प्रमुख प्रा. दिपाली मोरे यांनी दिली. f

ह कंपनी शैक्षणिक संस्था, महाविद्यालये, शाळा आणि उद्योगांना सॉफ्टवेअर च्या सेवा आणि उत्पादन पुरविण्याचे काम करते. या भेटीमधून विद्यार्थ्यांना सॉफ्टवेअर्सची निर्मिती, टेस्टिंग आणि तयार झालेले सॉफ्टवेअर ग्राहकांना हस्तांतरित करण्याच्या संपूर्ण प्रक्रियेची माहिती प्राप्त झाल्याचे कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग विभागाच्या प्रमुख प्रा. दिपाली मोरे यांनी सांगितले. महाविद्यालयातील ५२ हून अधिक विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग नोंदवला. हि भेट यशस्वी करण्यासाठी प्रा. शिवकुमार गोसावी आणि प्रा. कोमल कांबळे यांनी परिश्रम घेतले.

## मा.नगरसेवक सोमेश यावलकर यांचेकडून सततच्या पावसामुळे भक्तांसाठी मुरूमाची सोय स्व:खर्चातून रस्त्यावर मुरुम टाकून डागडुज



सांगोला : सततच्या पावसामुळे सांगोला शहरातील रस्ते खड्डे व पाण्याने भरलेले आहेत. या परिस्थितीत चालताना महिला भक्तांसाठी घसरून पडण्याचा धोका निर्माण होत होता. विशेषतः लोहार गल्लीतून नवरात्रीच्या काळात मोठ्या संख्येने महिला श्रद्धाळूंची वर्दळ असते, पण खड्ड्यांमुळे चालताना अडचणी निर्माण होतात. तातडीच्या अडचणी लक्षात घेऊन त्यांनी स्वतःच्या खर्चातून संबंधित ठिकाणी मुरूम टाकून नागरिकांना दिलासा दिला.

या परिस्थितीची दखल घेत सामाजिक बांधिलकी जोपासत मा.नगरसेवक सोमेश यावलकर यांनी स्वखर्चातून या भागात मुरूम टाकण्याची सोय केली. यामुळे महिला भक्तांना सुरक्षित आणि आरामदायी मार्ग मिळाला आहे. चालताना पाय फसण्याचा किंवा पडण्याचा धोका कमी झाल्याने उत्सवात सहभागी होण्याचा आनंद अधिक वाढला आहे. शहरातील भक्तासह नागरिकांनी या उपक्रमाचे कौतुक केले असून, अशा प्रकारच्या उपाययोजनांची भविष्यात अधिक आवश्यकता असल्याचे मत व्यक्त केले आहे. यासोबतच नागरिकांनी असेही सांगितले की, नगरपालिकेनेही रस्त्यांची योग्य दुरुस्ती करून पावसाळ्यात व नवरात्रीच्या काळात यासारख्या सुविधा वेळेत पुरवाव्यात. मुरूम टाकण्याच्या या उपाययोजनामुळे लोहार गल्लीत नवरात्री उत्सवात महिला भक्तांसाठी चालण्याची सुविधा सुधारली आहे आणि सुरक्षितता सुनिश्चित झाली आहे. यामुळे नगरातील नागरिकांच्या आणि भाविकांच्या दृष्टीने हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा ठरला असून मा.नगरसेवक सोमेश यावलकर यांचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन होत आहे.

## देशाच्या प्रगतीसाठी युवकांची जबाबदारी महत्त्वाची-डॉ.पी.जे.रुपनर

सांगोला : सांगोला महाविद्यालय, सांगोला येथे राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिनाच्या निमित्ताने विशेष संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात डॉ.गणपतराव देशमुख महाविद्यालय सांगोला येथील इंग्रजी विभाग प्रमुख डॉ.पी.जे.रुपनर यांनी पंतप्रधान यांच्या नेतृत्वाखाली देशाची प्रगती व पुढील वाटचाल या विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधला. आपल्या मार्गदर्शनपर भाषणात डॉ.रुपनर यांनी युवकांच्या भूमिकेवर विशेष प्रकाश टाकला. भारत आज जलदगतीने प्रगती करीत असताना, युवकांनी शिक्षण, कौशल्य विकास, संशोधन व तंत्रज्ञानाच्या माध्यमातून देशाच्या प्रगतीला चालना देणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले की, युवकांनी फक्त वैयक्तिक यशावर न थांबता समाज, राष्ट्र व जगाच्या कल्याणासाठी कार्य केले पाहिजे. स्वावलंबन, शिस्त, प्रामाणिकपणा व जबाबदारी ही मूल्ये अंगीकारल्यास भारताचा विकास प्रवास अधिक वेगाने होईल.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुरेश भोसले उपस्थित होते. त्यांनी युवकांना उद्देशून सांगितले की, आजच्या काळात स्पर्धात्मक जगात केवळ पदवी मिळविणे पुरेसे नसून चारित्र्य, शिस्त, स्वावलंबन आणि सामाजिक जबाबदारी या गुणांचे संवर्धन होणे आवश्यक आहे. युवकांनी राष्ट्रहिताला प्राधान्य देत प्रामाणिकपणे कार्य केल्यास भारताची प्रगती अधिक गतीमान होईल, असे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमास राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी डॉ.सदाशिव देवकर, डॉ.आर.जी.खानापुरे प्रा.सोनल भुंजे, डॉ.भाग्यश्री पाटील, प्रा.संतोष लोंढे, प्रा.अमोल ऐवळे,श्री महादेव काशीद आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# धनगर आरक्षणासाठी सर्वतोपरीने प्रयत्न करणार- आमदार डॉ भाई बाबासाहेब देशमुख

सांगोला : जालना येथे समस्त धनगर समाजाच्या वतीने धनगर समाजाला एस.टी.प्रवर्गात म्हणजे अनुसूचित जमातींमध्ये सामील करुन तमाम धनगरांना अनुसुचित जमातीचे आरक्षण मिळावे. यासाठी धनगर समाजाचे नेते मा.दिपक बोऱ्हाडे हे आमरण उपोषणाला बसले आहेत. जोपर्यंत धनगर समाजाचा सामावेश एस.टी. (अनुसूचित जमाती) आरक्षणामध्ये मध्ये करीत नाही तोपर्यंत उपोषण सोडले जाणार नसल्याचा निर्धार उपोषणकर्ते मा.दिपक बोऱ्हाडे यांनी केला. सांगोला विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ भाई बाबासाहेब देशमुख यांनी गुरुवार दि.२५ सप्टेंबर रोजी जालना येथे समक्ष जाऊन आरक्षणाच्या मागणीसाठी आमरण उपोषणाला बसलेले दिपक बोऱ्हाडे यांच्या उपोषणास आमदार डॉ भाई बाबासाहेब देशमुख यांनी पाठिंबा दिला.

यावेळी आमदार डॉ भाई बाबासाहेब देशमुख बोलताना म्हणाले की, मी स्वतः धनगर समाजाला अनुसूचित जमाती मध्ये समावेश करुन राज्य सरकारने या आरक्षणास ताबडतोब मान्यता द्यावी असे पत्र दोनच दिवसांपूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिले असल्याचे सांगीतले. तसेच लवकरच मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन धनगर समाजाच्या एस.टी.आरक्षणाच्या समावेशा बद्दल व राज्य भर धनगर समाज आपल्या न्याय हक्कासाठी लोकशाही मार्गाने आंदोलन करीत आहे त्यांची व्यथा सांगणार असल्याचे आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी सांगितले.

# काँग्रेस सांगोला तालुकाध्यक्षपदी अजयसिंह इंगवले-पाटील यांची निवड



सांगोला : काँग्रेस सांगोला तालुकाध्यक्षपदी अजयसिंह रमेश इंगवले पाटील यांची निवड करण्यात आली. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी निवडीचे पत्र दिले. तालुक्यात संघटन आणि तालुकाध्यक्ष पदाचा अनुभव असलेल्या अजयसिंह इंगवले यांची तालुकाध्यक्षपदी निवड करण्यात आल्याने कार्यकर्त्यांमध्ये उत्साह निर्माण झाला आहे. इंगवले यांनी तालुक्यात पक्षाचा विस्तार करण्याचे ध्येय ठेवले असून, काँग्रेसची ध्येय धोरणे जनमानसात पोहोचवून तालुक्यात संघटन मजबूत करण्याचा मानस व्यक्त केला आहे.

काँग्रेस पक्षाच्या सांगोला तालुकाध्यक्षपदासाठी मोठी रस्सीखेच सुरू असल्याने मागील काही महिन्यांपासून निवड रखडली होती. अखेर काँग्रेस पक्षाच्या तालुकाध्यक्षपदी अजयसिंह इंगवले यांची वर्णी लागली आहे. जिल्हाध्यक्ष काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी निवडीचे पत्र देऊन इंगवले यांचा सत्कार केला. पक्ष संघटन अधिक मजबूत करण्यासाठी युवा अभ्यासु व नेते अजयसिंह इंगवले यांची तालुकाध्यक्षपदी निवड केली आहे. अजयसिंह इंगवले-पाटील हे गेल्या पंधरा वर्षापासून काँग्रेसमध्ये सक्रिय असून त्यांनी काँग्रेस पक्षाच्या विविध विभागांवरती यापूर्वीकाम केले आहे.

यांच्या निवडीबद्दल प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, माणिकराव ठाकरे, खासदार प्रणिती शिंदे, सोलापूर ग्रामीण जिल्हाध्यक्ष सातलिंग शटकार यांचे आभार मानले आहेत. ग्रामीण भागातील सर्व तळागाळातील काँग्रेसवर प्रेम करणाऱ्या पदाधिकारी कार्यकर्ते यांना एकसंघ काँग्रेसमध्ये आणणार व आगामी सर्व निवडणुका काँग्रेस पक्षाच्या चिन्हावरती मोठ्या ताकतीने लढवणार असल्याचे काँग्रेसचे नूतन तालुकाध्यक्ष अजयसिंह इंगवले पाटील यांनी सांगितले.

# फॅबटेक मल्टीस्टेटच्या सभासदांना १५ टक्के लाभांश तर कर्मचाऱ्यांना एका महिन्याचा पगार दिपावली बोनस

## फॅबटेक मल्टीस्टेट बँकेची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात संपन्न



सांगोला : फॅबटेक मल्टिस्टेट कोऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि., सांगोला यांच्या ९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन मंगळवार, दि. २३ सप्टेंबर २०२५ रोजी करण्यात आले. ही सभा अत्यंत उत्साहवर्धक वातावरणात आणि भव्य प्रमाणावर पार पडली असल्याची माहिती सोसायटीचे चेअरमन भाऊसाहेब रूपनर यांनी दिली.

प्रारंभी सरस्वती पूजन व दीपप्रज्वलन चेअरमन भाऊसाहेब रूपनर, संचालक राजाभाऊ रूपनर, सुरेखा रूपनर, दिपक रूपनर, दिनेश रूपनर, डॉ.संजय आदाटे यांच्या हस्ते संपन्न झाला. प्रास्ताविक मुख्य कार्यकारी अधिकारी बाबासाहेब भोसले यांनी केले.

यावेळी मुख्य वित्त अधिकारी विजय तंडे यांनी आपल्या भाषणातून फॅबटेक मल्टिस्टेटच्या अल्पावधीत झालेल्या प्रगतीचा आढावा सादर केला. या उपरांत गेल्या आर्थिक वर्षातील नफा-तोटच्याचा तपशील, वार्षिक आर्थिक अहवाल, नवीन योजनांची माहिती, ठेवी व कर्ज वाटप याबाबत सविस्तर माहिती सभासदांसमोर मांडण्यात आली. या प्रसंगी संचालक राजाभाऊ रूपनर, विजयदादा येलपले, किरण पाटील यांच्यासह अनेक मान्यवरांनी मनोगत व्यक्त करत बँकच्या यशाचे कौतुक केले.

अध्यक्षीय भाषणात चेअरमन भाऊसाहेब रूपनर म्हणाले की, फॅबटेक मल्टिस्टेट कोऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी ने अल्पावधीतच अभूतपूर्व प्रगती साधली आहे. सभासद व ग्राहकांच्या विश्वासाच्या जोरावर महाराष्ट्र व कर्नाटक राज्यांत एकूण ३० शाखा सुरू करून समाजाच्या आर्थिक विकासात मोलाची भूमिका बजावली आहे. पारदर्शक कारभार, सुयोग्य व्यवस्थापन आणि नावीन्यपूर्ण उपक्रम यांच्या बळावर संस्थेने तब्बल ४१२ कोटी रुपयांची उलाढाल पूर्ण केली आहे, तसेच येत्या डिसेंबर अखेरीस १०० कोटी सोने तारण कर्ज वाटपाचा टप्पा पूर्ण करेल असा विश्वास चेअरमन यांनी व्यक्त केला. या आर्थिक वर्षात सभासदांना १५ टक्के लाभांश तसेच सर्व कर्मचाऱ्यांना एका महिन्याच्या पगाराएवढा बोनस देण्याचा ठराव करण्यात आला असून, ही परंपरा संस्थेच्या प्रगतीची साक्ष आहे.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व संचालक मंडळ, अधिकारी व कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले. सभेचे सूत्रसंचालन दत्तात्रय गायकवाड यांनी केले तर आभार मोनाली लोखंडे यांनी मानले.

# कोल्हापूर-कलबुर्गी रेल्वेचे अशोक कामटे संघटनेच्यावतीने स्वागत




सांगोला : रेल्वे क्रमांक ०१४५१ कोल्हापूर-कलबुर्गी स्पेशल रेल्वेचे स्वागत सांगोला स्थानकावर शहीद अशोक कामटे संघटनेच्यावतीने उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. माढा लोकसभा मतदारसंघाचे खासदार मा. धैर्यशिल मोहिते-पाटील, शहीद अशोक कामटे संघटना यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे कोल्हापूरकलबुर्गी-कोल्हापूर (गाडी क्र. ०१४५१ व ०१४५२) ही विशेष रेल्वे सेवा सुरू करण्यात आली आहे. अनेक महिन्यांपासून प्रवाशांची मागणी आज पूर्णत्वास आली.

या सेवेचा शुभारंभ (फ्लॅग ऑफ) सांगोला रेल्वे स्थानक येथे मा. खासदार यांच्या पत्नी सौ. शितलदेवी धैर्यशिल मोहिते-पाटील यांच्या शुभहस्ते करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रसंगी सांगोल्याचे आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या पत्नी सौ. डॉ. निकिताताई देशमुख उपस्थित होत्या. यावेळी फ्लॅग ऑफ समारंभ, रेल्वे इंजिन पूजन व चालकांचा सत्कार शाल , श्रीफळ देऊन करण्यात आला.

या कार्यक्रमाला रेल्वे प्रशासनाचे अधिकारी, स्टेशन अधीक्षक,सांगोला शहर व तालुक्यातील नागरिक, व्यापारी ,शहीद अशोक कामटे बहुउद्देशीय सामाजिक संघटनेचे पदाधिकारी, सदस्य तसेच विविध नेतेमंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या रेल्वे सेवेमुळे सांगोला तालुक्यासह परिसरातील नागरिकांना कोल्हापूर व सोलापूर ,कलबुर्गी या दोन्ही दिशांना प्रवासासाठी मोठी सुविधा उपलब्ध होणार आहे. कार्यक्रम यशस्वीतेसाठी अशोक कामटे बहुउद्देशीय सामाजिक संघटनेच्या सदस्यांनी परिश्रम घेतले. शेवटी आभार स्टेशन अधीक्षक गंगा कुमार सिंह यांनी मानले.

# सांगोल्यातील सौर प्रकल्पाचे पंतप्रधानांच्या हस्ते लोकार्पण सात गावांमधील २०९६ शेतकऱ्यांना दिवसा वीज



सांगोला : सांगोल्यातील शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळावी या उद्देशाने उभारण्यात आलेल्या दहा मेगावॅट क्षमतेच्या सौर प्रकल्पाचे लोकार्पण गुरुवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे झाले. या लोकार्पणामुळे सात गावांमधील तब्बल २०९६ शेतकऱ्यांना दिवसा शेतीसाठी वीजपुरवठा सुरू होणार आहे.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत सांगोला तालुक्यातील यलमार मंगेवाडी येथील ३२ एकर गायरान जमिनीवर हा सौर प्रकल्प उभारण्यात आला आहे. हा प्रकल्प ३३/११ केव्हीच्या यलमार मंगेवाडी उपकेंद्राशी जोडण्यात आला असून यामुळे कृषीपंपांना दिवसा थेट वीज मिळणार आहे.

या प्रकल्पामुळे कमलापूर, यलमार मंगेवाडी, अजनाळे, लिगाडेवाडी, वाटंबरे, बलवडी या गावांसह सात गावांतील दोन हजार ९६ शेतकरी लाभार्थी ठरणार आहेत. विशेष म्हणजे याआधी शेतकऱ्यांना रात्रीच्या वेळी वीज पुरवठा होत होता; मात्र आता ही सुविधा दिवसा उपलब्ध होणार आहे.

या प्रकल्पाच्या लोकार्पणावेळी अधीक्षक अभियंता सुनील माने, पंढरपूरचे कार्यकारी अभियंता विजय पाटील, सरपंच शीतल भडंगे, माजी सरपंच दत्ता मासाळ, उपसरपंच अनिल पाटील तसेच सनस्ट्रिम एनर्जी प्रायव्हेट लिमिटेडचे संचालक दिलीप कुमार आदी मान्यवर उपस्थित होते.

निर्भिड व सडेतोड बातम्या
नियमित वाचा...
साप्ताहिक माणदेश वार्ता